I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

**प्रथम खबर अहवाल**

**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S. (पोलीस ठाणे):** सदर बाज़ार **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0482 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/05/2025 18:56 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** शुक्रवार **Date from (दिनांक पासून):** 16/05/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 16/05/2025

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 17:07 तास **Time To (वेळेपर्यंत):** 19:16 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 28/05/2025 **Time (वेळ):** 18:00 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 022 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 28/05/2025 18:56 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पश्चिम, 2 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** सात रस्ता येथील कार्यकारी अभिय, सार्वजनिक बांधकाम विभाग कार्य, सोलापूर,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

**(a)** **Name (नाव):** गणेश विलास कुंभार

**(b)** **Father's Name (चे नाव ):** विलास कुंभार

**(c)** **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1984 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):**भारत

**(e)** **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f)** **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g)** **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

**(h)** **Occupation (व्यवसाय):**

**(i)** **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर,, सदर बाज़ार, सोलापुर शहर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर,, सदर बाज़ार, सोलापुर शहर, महाराष्ट्र, भारत |

**(j)** **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9764153999

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | शंकर काशीनाथ कवठे | | | 1. कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,Town/Village (शहर / गाव): सोलापूर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): सदर बाज़ार,District (जिल्हा): सोलापुर शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|
| | |

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्यादी जबाब दि. 28.05.2025

मी गणेश विलास कुंभार, वय- 41 वर्षे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर, मो.नं. 9764153999 समक्ष सरकारतर्फे फिर्याद देतो की,

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

मी दि. 01/11/2022 पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर येथे पोलीस उप अधीक्षक यापदावर युनिट प्रमुख म्हणून कार्यरत आहे. दि. 16/05/2025 रोजी मी कार्यालयात उपस्थित असताना, तक्रारदार नामे श्री. आशिषगीर शामगीर गोसावी, वय 35 वर्षे, धंदा ठेकेदार, रा. 53, बसवराज निलयनगर, रुबीनगर जवळ, जुळे सोलापूर यांनी आमच्या समक्ष हजर राहून, त्यांच्याकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत थोडक्यात तक्रार सांगितली. त्याप्रमाणे आम्ही पुढील कारवाई करण्यासाठी म्हणून पंच 1. श्री. आकाश अमोघसिध्द बिराजदार, वय 24 व्यवसाय-नोकरी पद- वरिष्ठ सहाय्यक (लेखा), अर्थ विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर मुळ रा. डोणज ता. मंगळवेढा व पंच 2. श्री. संदीप सुभाष घोडके, वय 34 वर्षे, व्यवसाय-नोकरी पद- वरिष्ठ सहाय्यक (लेखा) अर्थ विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर मुळ रा.पाठखळ,ता.मंगळवेढा जि.सोलापूर असे शासकीय पंच उपलब्ध करुन घेतले.

आमच्या सांगण्यावरुन तक्रारदार श्री. गोसावी यांनी वर नमूद पंचासमक्ष त्यांची तक्रार लिहून दिली ती थोडक्यात पुढील प्रमाणे “अष्टभुजा वडार मजूर सहकारी संस्था मर्यादित, सोलापूर यांना कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांच्याकडून मौजे हत्तूर, ता. दक्षिण सोलापूर येथे चर्मकार वस्ती येथे भुमिगत गटार व सिमेंट रस्ता करणे असे एकूण 4,24,759/- रुपयाचे काम दि. 16/07/2024 रोजी मिळालेले होते. त्याचा निविदा करारपत्र क्र. बी-1/ईई/37/2024-2025 असा आहे. सदरचे काम अष्टभुजा वडार मजूर सहकारी संस्था मर्यादित, सोलापूर यांचे तर्फे मी केलेले असून, त्यासंबंधी मजूर संस्थेचे चेअरमन श्री. रोहित अलकुंटे व माझ्यामध्ये लेखी संमती करारपत्र झालेले आहे. सदरचे काम पुर्ण झाल्यानंतर कामाचे मेझरमेंट बुक (एम.बी) नुसार बिल मी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांच्या सात रस्ता येथील कार्यालयात अंदाजे ऑक्टोंबर 2024 मध्ये सादर केले होते. सदर कामास समाज कल्याण कार्यालयाकडून निधी मिळणार असल्यामुळे सदरची फाईल तेथून समाज कल्याण, कार्यालयाकडे गेले. व तेथून कार्यवाही होवून अंदाजे मार्च 2025 मध्ये सदर बिल पुढील कार्यवाहीसाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांच्या कार्यालयात आलेले होती. त्यानंतर मी माझ्या बिलाबाबत सदर कार्यालयात पाठपुरावा करीत असताना, माझी भेट सदर कार्यालयातील कवठे क्लार्क यांच्याशी झाली व त्यांनी मला निधी अभावी मी केलेल्या कामापैकी आता फक्त 2,50,000/- रुपयाचे बिल निघणार असल्याचे सांगीतले. त्यावर मी होकार त्यांना देवून पुढील कार्यवाही करण्यास सांगीतले. त्यावर श्री. कवठे क्लार्क यांनी ठिक आहे असे सांगून, मला त्यांचा मो.नं. 9130000347 देवून पुन्हा भेटण्यास सांगीतले. त्याप्रमाणे काही दिवसांने मी त्यांना पुन्हा भेटलो असता, प्रत्येक वेळी काही ना काही कारण सांगूण, त्यांनी माझे बिल काढण्यास टाळाटाळ करीत होते. दि. 13/05/2025 रोजी माझी श्री. कवठे यांची त्यांच्या कार्यालयाचे बाहेर भेट झाली असता, मी त्यांना केलेल्या कामाचे बिल काढण्याबाबत विनंती केली असता, त्यांनी मला आता डीपीडीसीच्या कामामध्ये व्यस्त असल्याचे सांगीतले. त्यावर मी पुन्हा त्यांना माझी आर्थिक अडचण असल्याचे सांगीतले असता, त्यांनी माझ्याकडे 5,000/- रुपयांची मागणी केली. व शुक्रुवारी डीपीडीसीची मिटींग झाल्यानंतर पैसे घेवून येण्यास सांगीतले.” अशाप्रकारे तक्रारदार श्री. गोसावी यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर क्लार्क श्री. कवठे यांच्या विरुध्द असलेल्या लाच मागणीची तक्रार त्यांनी त्यांचे स्वहस्ताक्षरात लेखी लिहून देवून, त्यावर मी सही केली. सदर लेखी तक्रारीवर व तक्रारदार यांनी

दिलेले करारपत्र व इतर कागदपत्रवर पंच व आम्ही  सहया केल्या होत्या.

श्री. गोसावी यांनी दिलेल्या तक्रारीप्रमाणे क्लार्क श्री. कवठे यांची त्यांच्या कार्यालयात जावून भेट घेवून त्यांच्यावर पडताळणी कारवाई करणे असल्याचे सांगूण, त्याप्रमाणे आम्ही तक्रारदार व पंच यांना कार्यालयीन सोनी कंपनीचा व्हाईररेकॉर्डर दाखवून त्यांची माहिती देवून, त्यामध्ये नवीन मेमरी कार्ड टाकले. व आम्ही यांनी तक्रारदार श्री. गोसावी, पंच नं.01 श्री. बिराजदार व पंच नं.02 श्री.घोडके यांना पडताळणी कारवाईच्या अनुषगांने सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही हॉईसरेकॉर्डर सुरु करुन, तो श्री. गोसावी यांच्या गळयात शर्टाचे आत बनियानच्या आतील बाजूस अडकविला व आम्ही दिलेल्या सुचनेप्रमाणे श्री. गोसावी व पंच नं.1 बिराजदार यांना त्यांच्याकडील होंडा ड्रीम युगा मोटार सायकल क्र. एमएच 13 बीडब्लू 4047 वरुन क्लार्क श्री. कवठे यांची भेट घेण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय, सात रस्ता, सोलापूर या ठिकाणी जाणेकरीता 17.07 वाजता रवाना केले होते. आम्ही व पंच क्र. 02 श्री. घोडके असे कार्यालयात थांबून राहिलो. त्यानंतर तक्रारदार व पंच नं. 01 असे कार्यालयात परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांच्याकडील व्हाईसरेकॉर्डर काढून अंदाजे 17.23 वाजता बंद केला. त्यानंतर त्यांना सदर बाबत हकीकत विचारली असता, सदर पडताळणी कारवाईमध्ये तक्रारदार यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय येथे जावून क्लार्क श्री. कवठे यांची भेट घेतली व त्यांना उददेशून “नमस्ते साहेब काय काराव आमचं..” असे म्हणाले, त्यावर क्लार्क श्री. कवठे “बोला कि” असे म्हणाले. त्यावर तक्रारदार “हया अष्टभुजाच” असे बोलून त्यांच्या कामाच्या बिलाच्या अनुषंगाने बोलणे केले. त्यावर श्री. कवठे “बील कुठाय” असे म्हणून त्यांच्या कार्यालयातील दुस-या क्लार्कला “ते..हे..ये..हो..हयांचे सगळयांचे फोन मला येतेत..काय विषय मला कळनां.. बील तुमच्या कडं असतेत..पाठवल नाही ..का.. साहेबांना सहीलां..” असे विचारले. त्यावर तक्रारदार त्यांना “दोन महिने झाले साहेब..मार्च..एंड म्हणले..मार्च एंड होवून एप्रिल एंड होवून आता मे एंड होतय..” असे म्हणाले असता, श्री. कवठे “ते सिस्टीमच तसल सामाजिक न्याय म्हटल कि.. आमचं डोकं..उठतंय” असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी “तिथल क्लिअर करुन..” असे विचारले असता, श्री. कवठे “लोकं…चेक देत नाहीत व्यवस्थित कुठल्याही अकाऊंटला टाकतेत..ते काढुन आपण..भरायचं… तिथ… तुम्ही तिथ बघीतली सगळी प्रोसेजिर..” असे म्हणाले. त्यावर तक्रारदार श्री. कवठे यांना “काम उगीच घेतल अस झालंय आता…” असे म्हणाले. त्यावर श्री. कवठे त्यांना “ते आता घेवुपण नका इथन पुढं…झाल का हयांच” असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार “तुम्हीच दया साहेब करुन ते…” असे म्हणाले असता, क्लार्क श्री. कवठे यांनी त्यांच्या उजव्या हाताचा अंगठा तर्जनीवर घासून इशा-याने तक्रारदार यांच्याकडे पैशाची मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना “साहेब किती हे करायच सांगा म्हणजी..किती ..बिलाच..” असे विचारले असता, श्री. कवठे त्यांना “पहिल काम तर हुदे तुमचे सहीला ठेवतो मी..” असे म्हणून त्यांच्या कार्यालयातील दुस-या क्लार्कला “सहीला ठेवलयं..ओ यांचं बिल सहीला ..ठेवा रावसाहेब…” असे म्हणाले. त्यावर तक्रारदार “नाही..अ…किती…” असे श्री कवठे यांना म्हणाले असता, श्री. कवठे “पाच…सायबाचं” असे म्हणाले. त्यावर तक्रारदार हे त्यांना “नाही..तुमचं सांगा..सायबाच काय…” असे म्हणाले असता, श्री. कवठे “सायबांच बोललो..अ..” असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार “तुम्ही.. किती वेळ हाय..किती वेळ हाय..” असे म्हणाले असता, श्री. कवठे “हाय.. पहिलं काम हुदे तुमचं… झाल…पहिल बील सहीला ठेवून घ्या…” असे म्हणाले. त्यावर तक्रारदार “10-15 मिनीटात करतो..”

असे म्हणाले असता, श्री. कवठे त्यांना “काम करु पहिलं...” असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार हे कार्यालयातील दुस-या क्लार्कला उद्देशून “साहेब...ओ साहेब...मार्च एंड म्हणलावतां...जरा सांगा साहेबाला..मार्च एंड झालंय..” असे म्हणाले, असता ते क्लार्क श्री. कवठे यांना “करा त्यांचं...सर” असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व पंच नं. 01 असे त्यांचे मोटार सायकल वरुन परत ॲन्टी करप्शन कार्यालयात आले. अशी हकीकत सांगीतली. सदरबाबत आम्ही तक्रारदार यांचे गळ्यातुन काढुन घेतलेला व्हाईसरेकॉर्डर कार्यालयातील संगणकाला जोडुन त्यातील मेमरी कार्डवर ध्वनीमुद्रीत झालेली संभाषणाचे फाईलमधील आवाज तक्रारदार यांच्याकडुन ओळखुन घेवुन, सदर ध्वनिमुद्रीत फाईलमधील संभाषण त्यांनी व आम्ही सर्वांनी ऐकून सदर बाबत खात्री करुन घेतली.

त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना क्लार्क श्री. कवठे हे “पाच...सायबाचं” असे म्हणून कोणत्या साहेबांसाठी लाचेची मागणी करीत आहेत व पडताळणी कारवाईपूर्वी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी क्लार्क श्री. कवठे त्यांच्याकडून त्यांचे नाव स्पष्ट करुन घेवून, संबंधीत साहेब यांची भेट घेवून, श्री. कवठे यांच्याकडून होत असलेल्या लाच मागणीप्रमाणे त्यांच्याकडे पडताळणी कारवाई का केले नाही असे विचारले. तक्रारदार यांनी सदर पडताळणी कारवाईवेळी ते भीतीने गोंधळून गेल्यामुळे दिलेल्या सुचनेप्रमाणे, त्यांनी श्री. कवठे यांच्याकडून संबंधीत साहेबांचे नाव स्पष्ट करुन, त्यांच्यावर पडताळणी कारवाई न केल्याचे आम्हास सांगीतले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. गोसावी पुन्हा क्लार्क श्री. कवठे यांची त्यांच्या कार्यालयात जावून भेट घेवून, ते नेमके कोणत्या साहेबांसाठी लाचेची मागणी करीत आहेत, ते स्पष्ट करुन घेवून, त्यांची भेट घालून देण्याची विनंती करावी अगर आपण स्वत: संबंधीत साहेब यांची भेट घेवून श्री. कवठेकडून होत असलेल्या लाचे मागणीप्रमाणे त्यांच्याकडे पडताळणी कारवाई करावी असे सांगीतले. त्यावेळी श्री. गोसावी यांनी सांगीतले की, त्यांनी दिलेल्या तक्रारीप्रमाणे त्यांची तक्रार फक्त क्लार्क श्री. कवठे यांच्याविरुध्दच असून, श्री. कवठे हे लाचेच्या रक्कमेमध्ये वाढ करुन घेण्यासाठी जाणूनबुजून साहेबांच्या नावाने त्यांच्याकडे लाचेची मागणी करीत असल्याचे व यापूर्वी सदर कामाच्या अनुषंगाने श्री. कवठे यांच्या झालेल्या भेटी दरम्यान त्यांनी कधीही कोणत्याही साहेबांच्या नावाचा उल्लेख करुन त्यांच्याकडे पैशाची मागणी केली नसल्याचे व वरील प्रमाणे करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान त्यांनी श्री. कवठे यांना 15 ते 20 मिनीटामध्ये पैसे घेवून येत असल्याचे सांगीतल्यामुळे, तक्रारदार यांनी प्रथम साहेबांचे नाव स्पष्ट करण्याचे दृष्टीने श्री. कवठे यांचेवर पुन्हा पडताळणी कारवाई करण्यास मी नकार दिला.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. गोसावी यांना अन्टी करप्शन ब्युरोच्या कामकाजाची प्रक्रिया सविस्तर समजावून सांगीतली असता, त्यांनी क्लार्क श्री. कवठे यांची पुन्हा भेट घेवून, ते नेमके कोणत्या साहेबांच्या नावाने लाचेची मागणी करीत आहेत, ते स्पष्ट करुन घेवून संबंधीत साहेब यांची भेट घेवून, श्री. कवठे यांच्याकडून होत असलेल्या लाच मागणीप्रमाणे त्यांच्याकडे पडताळणी कारवाई करण्यास संमती दिली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच यांना वर नमूद व्हाईस रेकॉर्ड बाबत माहिती पुन्हा देवून, त्यामध्ये वरील प्रमाणे पडताळणी कारवाई दरम्यान वापरलेले मेमरीकार्ड मधील फाईल क्रमांक 01 असे असुन सदर मेमरीकार्ड पुढील कार्यवाही करिता वापरत असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. गोसावी यांना वरील प्रमाणे सुचना देवून, श्री. कवठे यांच्याकडून ते नेमके कोणत्या साहेबांच्या

नावाने लाचेची मागणी करीत आहेत, ते त्यांच्याकडून स्पष्ट करुन घेवून, क्लार्क श्री. कवठे यांच्याकडे त्यांची भेट घालून देण्याची विनंती करावी अगर आपण स्वत: संबंधीत साहेब यांची भेट घेवून, श्री. कवठे यांच्याकडून होत असलेल्या लाचे मागणीप्रमाणे त्यांच्याकडे पडताळणी कारवाई करावी अशी सुचना दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. गोसावी यांचे गळयात शर्टाचे आत बनियानच्या आतील बाजूस व्हॉईसरेकॉर्डर अडकविला व त्यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे तक्रारदार श्री. गोसावी व पंच नं.1 श्री. बिराजदार यांना तक्रारदार यांचेकडील होंडा शाईन मोटार सायकल क्र. एमएच 13 डीव्ही 5329 वरुन क्लार्क श्री. कवठे यांची भेट घेण्याकरीता पुन्हा सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय, सात रस्ता, सोलापूर या ठिकाणी जाणेकरीता सुमारे 18.04 वा. रवाना केले. त्यानंतर तक्रारदार श्री. गोसावी व पंच नं.01 श्री. बिराजदार असे कार्यालयात परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार श्री. गोसावी यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद करुन ताब्यात घेतला. ती वेळ सुमारे 19.16 वा. होती. त्यानंतर त्यांना सदर बाबत हकीकत विचारली असता, सदर पडताळणी कारवाईमध्ये तक्रारदार व पंच नं. 01 असे सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय येथे गेलो असता, तेथे क्लार्क श्री. कवठे हे यांच्या टेबल्या ठिकाणी ते दिसून आले नाहीत. म्हणून तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलवरुन क्लार्क श्री. कवठे यांच्या मोबाईलवर फोन केला, परंतू त्यांनी उचलला नाही. त्यानंतर पुन्हा फोन लावला असता, तोही फोन उचलला नाही. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार यांनी पुन्हा फोन लावला असता, श्री. कवठे यांना फोन उचलला व ते आता साहेबांच्या केबिनमध्ये असल्याचे सांगून तक्रारदार यांना थांबण्यास सांगीतले. त्यावेळी तक्रारदार यांनी फोनवरुन श्री. कवठे यांना “साहेब..ते..अ..मगाशी तुम्ही..साहेबांच म्हणलाव..कुणाच हि..करायच..” असे विचारले असता, श्री. कवठे “आलो..थांबा..आलो मी” असे म्हणून फोन कट केला. त्यानंतर आम्ही श्री. कवठे यांची वाट पाहत तेथेच थांबलो. बराच वेळ झाला तरी श्री. कवठे आले नाहीत म्हणून तक्रारदार यांनी पुन्हा त्यांच्या मोबाईलवरुन श्री. कवठे यांना फोन केला असता, श्री. कवठे “अरे..बापरे..विसलोच तुम्हाला आलोच इथच आहे मी अजुन साहेबांचे केबिनमध्ये.. तुमी कुठं हायत..” असे म्हणून साहेबांच्या केबिनमधून “अरर..रर.. ते कॅमेरे चेक करायला चालु होतं बसा...कुठाय” असे फोनवरुन म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी श्री. कवठे यांना इशारा करुन “इथ साहेब...इथच” असे फोनवरुन सांगून, नंतर फोन बंद केला. त्यानंतर श्री. कवठे आमच्याजवळ येवून “ओ.. विसरलो होतो मी तुम्ही हाय म्हणुन” असे तक्रारदार यांना म्हणाले. त्यावर तक्रारदार हे त्यांना “नाही..नाही.. काय हरकत नाही ..सर आता साहेबांच कुणाचं..कुणाचं दयायच म्हणलांत..” असे म्हणाले असता, श्री. कवठे यांनी कार्यकारी अभियंता यांच्या दालनाकडे इशारा केला. त्यावर तक्रारदार यांना श्री. कवठे यांना “ठाकरे साहेबांच...” असे विचारले असता, श्री. कवठे “हूं...” असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार हे त्यांना “त्यांच राहु दे तुमच सांगा कि..” असे म्हणाले असता, श्री. कवठे “नाही माझ काय नसतंय..अं...माझं काय ऐवढं नसतं...” असे म्हणाले. त्यावर तक्रारदार त्यांना “अ..नाही तुमच हे केल..असत..त्यांच... हा..सर..” असे म्हणाले असता, श्री. कवठे हे “माझ काय नसतंय ओ..एवढ..साहेबांच..सही साठी सांगीतल तुम्हाला दुसरं काही सांगू...” असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार पुन्हा त्यांना “तुमचं ही केलं असतो की...” असे म्हणाले. त्यावर श्री. कवठे “मला काय तुम्ही दिलं ती मी घेतल.. अस..काय नसतय एवढच पाहिजे म्हणुन काय काळजी करु नका माझ तुमची तुम्ही करून घ्या..पहिल..” असे म्हणाले. त्यावर तक्रारदार ठीक आहे असे म्हणून ते व पंच नं. 01 असे त्यांचे मोटार सायकल वरुन

परत अॅन्टी करप्शन कार्यालयात आले. अशी हकीकत सांगीतली. सदरबाबत आम्ही तक्रारदार यांचे गळ्यातुन काढुन घेतलेला व्हाईसरेकॉर्डर कार्यालयातील संगणकाला जोडुन त्यातील मेमरी कार्डवर ध्वनीमुद्रीत झालेली संभाषणाचे फाईलमधील आवाज तक्रारदार यांच्याकडुन ओळखुन घेवुन, सदर ध्वनिमुद्रीत फाईलमधील संभाषण त्यांनी व आम्ही सर्वांनी ऐकून सदर बाबत खात्री करुन घेतली. त्यावेळी आम्ही तक्रारदार श्री. गोसावी यांना पडताळणी कारवाईपूर्वी दिलेल्या सुचनाप्रमाणे क्लार्क श्री. कवठे यांनी साहेबांच्या नावाने केलेल्या लाच मागणीबाबत आपण क्लार्क श्री. कवठे यांच्या मार्फत अगर थेट ठाकरे साहेब यांची भेट घेवून श्री. कवठे यांनी लाच मागणी केल्याप्रमाणे पडताळणी कारवाई का केली नाही असे विचारले असता, तक्रारदार यांनी सदर वेळी ठाकरे साहेब कार्यालयात उपस्थित नसल्याने त्यांची भेट होवू शकली नाही, त्यामुळे त्यांच्यावर पडताळणी कारवाई करण्यात आली नसल्याचे आम्हास सांगीतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना सबंधीत साहेब यांचा ठावठिकाण काढून त्यांची प्रत्यक्ष भेट घेवून किंवा फोनवरुन संपर्क साधून, त्याप्रमाणे भेट घेवून अगर फोनव्दारे त्यांचेवर पडताळणी कारवाई करण्याबाबत सांगीतले असता. तक्रारदार यांनी त्यांची फक्त क्लार्क श्री. कवठे यांच्याविरुध्दच तक्रार असल्याचे तसेच आज रोजी सोलापूर जिल्हयाची जिल्हा नियोजन बैठक होती, व सदर बैठकीनिमीत्त साहेब हे दिवसभर कार्यालयात आलेले नव्हते. व कार्यालयीन वेळ संपल्याने साहेब यांची भेट होणे शक्य नसल्याचे सांगीतले तसेच जर त्यांनी थेट साहेबांना फोन केला तर त्यांना सदर कारवाईबाबत संशय येईल व ते त्यांच्याशी लाचेबाबत काहीएक बोलणार नाहीत असे सांगून आज रोजी त्यांचेवर पडताळणी करण्यास नकार दिला. व दि. 17/05/2025 रोजी सबंधीत साहेब यांना समक्ष भेटून पडताळणी करण्याबाबत तक्रारदार यांनी पंचासमक्ष आम्हास विनंती केली. त्याप्रमाणे दि. 16/05/2025 रोजीची कारवाई स्थगित करुन, आम्ही दि. 17/05/2025 रोजी पुढील पडताळणी कारवाई करणार असल्याचे तक्रारदार व पंचाना सांगून, झाले कारवाईबाबत गोपनीयता राखण्याच्या सुचना दिलेल्या होत्या.

दि. 17/05/2025 रोजी तक्रारदार श्री. गोसावी व पंच क्र. 01 श्री. बिराजदार व पंच क्र. 02 श्री. घोडके असे अॅन्टी करप्शन कार्यालयात आमच्या कक्षात हजर झाले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना काल रोजी श्री. कवठे यांच्यावर करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईमध्ये त्यांनी तक्रारदार यांच्याकडे प्रलंबित बिल काढून देण्यासाठी म्हणून साहेबांच्या नावाने 5 हजार रुपयांची लाच मागणी केली असल्याचे निष्पन्न झाल्याने, त्याअनुषंगाने संबंधीत साहेब यांचेवर पुढील पडताळणी कारवाई करावयाची असल्याचे सांगीतले. त्यावेळी तक्रारदार श्री. गोसावी यांनी आम्हास पंचासमक्ष सांगीतले की, आज रोजी शनिवार असल्याने, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या कार्यालयाला शासकीय सुट्टी असल्यामुळे आज रोजी सदर कार्यालयात कोणाचीही भेट होणे शक्य नसल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना संबंधीत साहेब यांना फोनवरुन संपर्क साधून, त्याप्रमाणे भेट घेवून अगर फोनव्दारे त्यांचेवर पडताळणी कारवाई करण्याबाबत सांगीतले असता. तक्रारदार यांनी तसे करण्यास नकार देवून, जर त्यांनी थेट साहेबांना फोन केला तर त्यांना कारवाईबाबत संशय येईल व ते त्यांचेशी लाचेबाबत काहीएक बोलणार नाहीत त्यामुळे सोमवार दि. 19/05/2025 रोजी कार्यालयीन वेळेमध्ये संबंधीत साहेब यांची भेट घेवून पुढील कारवाई करण्यात यावी असे तक्रारदार यांनी पंचासमक्ष आम्हास सांगीतले.

दि. 19/05/2025 रोजी तक्रारदार यांना पुढील कारवाईसाठी कार्यालयात हजर राहण्याबाबत वेळोवेळी

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

फोनव्दारे संपर्क केला असता, तक्रारदार यांनी कार्यालयात हजर राहण्याबाबत टाळाटाळ करुन तक्रारदार हे सदर दिवशी पुढील कारवाईसाठी कार्यालयात हजर झाले नाहीत, त्यामुळे पुढील कारवाई करण्यात आलेली नाही. त्यानंतर दि. 20/05/2025 रोजी तक्रारदार श्री. गोसावी यांनी कार्यालयात हजर राहून दि. 16/05/2025 रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग येथील क्लार्क श्री. कवठे यांच्या विरुध्द मानसिक त्रास व रागाच्याभरात दिलेली तक्रार मागे घेते असून, तसेच त्यांनी पुढे कारवाई केल्यास त्यांचे व्यावसाईक नुकसान होणार असल्याने त्यांना यापुढे क्लार्क श्री. कवठे व त्यांचे साहेब यांच्यावर पुढील कोणतीही पडताळणी/सापळा कारवाई करावयाची नसल्याबाबत सविस्तर लेखी अर्ज लिहून दिलेला आहे.

एकंदरीत तक्रारदार श्री.गोसावी यांनी दि.16/05/2025 रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभागातील क्लार्क श्री. कवठे क्लार्क यांच्या विरोधात दिलेल्या तक्रारीप्रमाणे तक्रारदार श्री.गोसावी यांचे करवी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईमध्ये तक्रारदार श्री. गोसावी यांच्याकडे मौजे- हत्तुर ता.दक्षिण सोलापूर येथे चर्मकार वस्ती येथे भुमिगत गटार व सिमेंट रस्ता करणे असे केलेल्या कामाच्या एकुण बिलापैकी 2,50,000/- रुपयाचे बिल काढुन देण्यासाठी क्लार्क श्री. कवठे यांनी साहेबांच्या नावाने तक्रारदार श्री. गोसावी यांचेकडे 5000/- रुपये लाचेची मागणी केली असल्याचे ध्वनीमुद्रीत संभाषणावरुन तसेच पंच साक्षीदार यांनी सांगितलेल्या हकीकतीवरुन निष्पन्न झाले आहे. श्री. कवठे यांचे नाव व पदाबाबत गोपनिय माहिती काढली असता, त्यांचे नाव श्री. शंकर काशीनाथ कवठे, पद वरिष्ठ लिपीक, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर असे असल्याची माहिती मिळाली आहे.

तरी सदर कारवाईचा सापळा अधिकारी म्हणून माझी श्री. शंकर काशीनाथ कवठे, पद वरिष्ठ लिपीक, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांनी तक्रारदार श्री. गोसावी यांचेकडे वरील प्रमाणे लाचेची मागणी करुन ती स्विकारण्याचा प्रयत्न करुन, बेकायदेशीर आर्थिक फायदा मिळवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणून माझी त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7, 7 अ अन्वये सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

हा फिर्यादी जबाब दिला. स.ता.म.

समक्ष

(उमाकांत महाडिक)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** Umakant Netaji Mahadik **Rank (हुद्दा):** पोलीस उपनिरीक्षक

**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** ajit shankar lakade

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** PI

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्यंग वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)**